Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 27/02/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## कादंबरीकार, कथाकार ज्योत्स्ना देवधर

ज्योत्स्ना देवधर हे नाव मराठी साहित्यात कादंबरीकार व कथाकार म्हणून आदराने घेतले जाते. ज्योत्स्ना केशव देवधर या पूर्वाश्रमीच्या कुसुम थत्ते. त्यांचा जन्म २७ फेब्रुवारी १९२६ रोजी राजस्थानातील जोधपूर येथे झाला. त्यांनी पुणे विद्यापीठातून एमए (हिंदी) केले तसेच वर्धा येथून साहित्य विशारद ही पदवी संपादन केली. १९६० ते १९७० या दशकाच्या उत्तरार्धात मराठीत ज्या स्त्रीलेखिका पुढे आल्या त्यांमध्ये ज्योत्स्ना देवधर हे नाव महत्त्वाचे आहे. 'तरुण भारत' (पुणे) या दिवाळी अंकात ज्योत्स्नाबाईंची 'घर गंगेच्या काठी' ही पहिली मराठी कादंबरी आली. पुढे लगेचच (१९६७) ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली आणि कादंबरीकार म्हणून त्यांची स्वतंत्र नाममुद्रा उमटली. पुढच्याच वर्षी १९६८ मध्ये त्यांची 'कल्याणी' ही कादंबरी प्रसिद्धीच्या झोतात आली. त्यांच्या अन्य लेखनाप्रमाणेच या दोन्ही कादंबऱ्यांचे विषय कौटुंबिक, विशेषत: एकत्र कुटुंब पद्धती आणि तिच्यामधील स्त्री हेच होते. या कुटुंब पद्धतीचे गुण-दोष आणि मर्यादाही त्यांच्या लेखनातून स्पष्ट होतात.

ज्योत्स्नाबाईंची भाषा साधी, सोपी, घराघरात वापरली जाणारी आहे. त्यामुळे शब्दांच्या जंजाळात फारशी अडकत नाही. व्यक्तिचित्रणात्मक कादंबऱ्यांतही ज्योत्स्नाबाई वेगळेपण राखून आहेत. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांबरोबर वीस कथासंग्रह प्रसिद्ध झाले असून त्यात 'गाऱ्या-गाऱ्या भिंगोऱ्या' (१९६९) ते 'याचिजन्मी' (१९९९) या प्रदीर्घ काळखंडातील त्यांचा कथाविषयक लेखनप्रवास समोर येतो. त्यांच्या पुस्तकांचे अन्य भाषांत अनुवाद झाले असून त्यांनी स्वत: हिंदीतून विपुल लेखन केले आहे. अनेक पुरस्कार विजेत्या ठरलेल्या ज्योत्स्नाबाईंना केंद्र सरकारचा 'अहिंदी भाषा-भाषी लेखक' पुरस्कारही मिळाला आहे. ज्योत्स्ना देवधर यांचे १७ जानेवारी २०१३ रोजी पुणे येथे निधन झाले.

Nashik Edition
Feb 27, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401